स.फौ.के. नं. ९६/२०२२

नि. क्र. २५ लगत

**तक्रारदारातर्फे साक्षीदार क्र. ०१ तक्रारदार संस्थेचा प्रतिनिधी कमलाकर सिताराम कनावजे यांचा उलटतपास शपथेवर, आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जी. आर. गाणू यांचेकडून सुरु –**

**०७.** हे म्हणणे खरे आहे की, मी वसूली अधिकारी असल्याबाबत या कामी काही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी 'वसुली अधिकारी' म्हणून तक्रार दाखल करत असल्याबाबत काही कागदोपत्री पुरावा या कामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ३४ कडील ठरावात धनादेशाचा क्रमांक किंवा तारीख नमूद नाही.

**०८.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपीकडून कर्ज रक्कमेच्या वसूलीसाठी आम्ही कोणत्याही न्यायालयात प्रकरण दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पतसंस्थेचे कोण कर्मचारी आरोपीकडे वसुलीसाठी गेले होते त्यांची नावे व पद मी सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत आहे त्याप्रमाणे वसुलीसाठी आरोपीकडे पतसंस्थेचा कोणताही कर्मचारी गेलाच नाही. हे म्हणणे खरे आहे की, पतसंस्थेचा कोण कर्मचारी कोणाकडे वसूलीसाठी गेला याबाबत नोंदी असलेली नोंदवही असते. हे म्हणणे खरे आहे की, तशी नोंदवही किंवा त्या नोंदवहीचा उतारा मी या कामी दाखल केलेला नाही.

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने किती तारखेचा धनादेश दिला हे माझ्या तक्रारमध्ये तसेच पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणी धनादेश वठविण्याकरीता सादर केल्याबाबतची चेक डीपॉझीट स्लीप मी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या पतसंस्थेकडून कर्ज दिले जाते त्यावेळी कर्जदाराकडून हमीपोटी काही धनादेश घेवून ठेवले जातात.

**प्रश्न** – तक्रारमध्ये किंवा सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात निशाणी २९ कडील धनादेशातील मजकूर कोणाच्या हस्ताक्षरातील आहे हे नमूद नाही, हे खरे का ?

('धनादेश आरोपीने दिला नाही' असे आरोपीच्या वतीने सूचीत करण्यात आलेले नाही, त्यामुळे सदरचा प्रश्न विचारता येत नाही, असा आक्षेप तक्रारदाराचे विधीज्ञ यांनी घेतला. विचारण्यात आलेला प्रश्न प्रकरणाशी संबंधीत असल्याने, आक्षेप नामंजूर).

**उत्तर** – हो, हे खरे आहे.

हे म्हणणे खरे नाही की, निशाणी २९ कडील धनादेशातील मजकूर आमच्या पतसंस्थेच्या कर्मचाऱ्याने लिहिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी २९ कडील धनादेश व निशाणी ३३ कडील पोस्टाची पोहोच पावती यांवरील सहया भिन्न आहेत, साक्षीदार सांगतो की, ज्यावेळी पोस्टाची नोटीस आरोपीला पोहोचली त्यावेळी आरोपीचा अपघात झालेला होता, हाताला लागल्यामुळे त्याला व्यवस्थीत लिहिता येत नव्हते. त्यावेळी आरोपीचा अपघात झालेला होता, त्याला व्यवस्थीत लिहिता येत नव्हते, याबाबत, तसे दाखविणारा माझ्या शब्दांव्यतिरीक्त अन्य कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपीचा अपघात झालेला होता, त्याला व्यवस्थीत लिहिता येत नव्हते, असे मी खोटे सांगत आहे.

**१०**. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/०१/२०२२ रोजी पर्यंत आरोपीकडे मुद्दल व व्याज अशी एकूण कर्ज रक्कम १,००१५६ (एक लाख एकशे छप्पन रुपये) थकीत दिसत होती, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पतसंस्थेचे कर्मचारी आरोपीकडे वसूलीसाठी गेले असता त्याने त्याच्या सहीचा धनादेश दिल्याचे मी खोटे सांगत आहे.

**११**. हे म्हणणे खरे नाही की, तो धनादेश आमच्या पतसंस्थेने वठविण्यासाठी बँकेत सादर केला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, 'अपुरी रक्कम' या कारणास्तव तो धनादेश बँकेकडून परत आला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीला नोटीस पाठविली असे मी खोटेच सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला नोटीस मिळाली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तरीही आरोपीने रक्कम दिली नाही असे सुध्दा मी खोटे सांगत आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे धनादेशावर '१७/०१/२०२२' अशी तारीख आहे (सदर उत्तर साक्षीदाराने धनादेश न

पाहता दिले आहे).

**१२**. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आमच्या पतसंस्थेला कोणतेही देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने वादातील धनादेश आमच्या पतसंस्थेला दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने त्याच्या सहीचा धनादेश दिल्याचे मी खोटे सांगत आहे.

**१३**. मी या प्रकरणी दाखल केलेली कागदपत्रे वाचूनच दाखल केलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कागदपत्रांबाबत खात्रीकरुनच त्याबाबतचा तपशिल मी पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकूर खोटाच आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीवर दबाव आणण्यासाठीच केवळ खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**.

**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.07.12 17:58:54 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक १२/०७/२०२४ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 12/07/2024 |
| Order signed by PO. on | :- | 12/07/2024 |
| Order uploaded on | :- | 12/07/2024 |